# प्रेसनोट

## वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हेशाखा, पुणे शहर कडून ०४ रॉयल इनफिल्ड बुलेट मोटारसायकलीं आणि ०२ सुझुकी एक्सीस गाडया चोरी करणा-या आंतरराज्यीय टोळीतील ०३ इसमांना अटक.

दिनांक ११/०९/२०१८ रोजी वाहनचोरी विरोधी पथक, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील पोलीस कर्मचारी जितेंद्र तुपे, गणेश साळुंके, सागर घोरपडे यांना मिळालेल्या बातमीदाराचे बातमी मिळाली की, विश्रामबाग पोलीस स्टेशन हद्दीतून चोरीस गेलेली बुलेट मोटारसायकल ही दोन इसम घेऊन पुणे-बेंगलोंर हायवे वरुन जात आहेत अशी बातमी मिळाल्याने वाहनचोरी विरोधी पथकातील कर्मचारी जितेंद्र तुपे, गणेश साळुंके, सागर घोरपडे, मोहन येलपले यांनी बातमी प्रमाणे त्यांचा पाठलाग करुन कर्नाटक-महाराष्ट्र राज्याचे सिमारेषेजवळ त्यांना पकडले. त्यांना ताब्यात घेऊन त्यांनी आपली नावे, पत्ते १) युनूस अमीर हमजा शेख, वय-५०, रा. गणपती पेठ, जैन वस्तीमागे, सांगली, २) बसवराज बसलिंगअप्पा वन्नूर, वय-४९, रा. मुं. मुहारे, पो. देशनूर ता. बैलव्हंगल, जि. बेळगांव, कर्नाटक असे असल्याचे सांगितले व त्यांचेकडे चोरीची बुलेट मोटारसायकल मिळून आली. त्यांच्याकडून ०१ बुलेट मोटारसायकल जप्त करुन सदरची मोटारसायकल ही इसम नामे ३) हरेश ऊर्फ हनी विजयकुमार रामत्री, वय-२४, रा. सेक्टर नं. २९,विजय व्हिला मागे, रुम नं.४, उल्हासनगर स्टेशन रोड, जि. ठाणे याने चोरली असल्याचे सांगितल्याने त्यास त्यांच्या मदतीने ताब्यात घेऊन त्याने तपासात पुणे शहरातून नवीन बुलेट मोटारसायकलीं व नवीन सुझुकी एक्सीस कंपनीच्या गाडया चोरल्याचे कबुल केले वरुन आणखीन ०३ रॉयल इनफिल्ड बुलेट मोटारसायकल व ०२ सुझुकी एक्सीस गाडया चोरुन आणून त्याने युनूस अमीर हमजा शेख व बसवराज बसलिंगअप्पा वन्नूर या दोघांच्या मदतीने त्या गाडया जमखंडी, अर्सीकेरे, बेंगलोर, राज्य कर्नाटक या ठिकाणी विकल्याचे सांगितल्याने त्या गाडया कर्नाटकातून विविध ठिकाणांहून ताब्यात घेऊन वरील तीन आरोपींकडून **वाहनचोरीचे एकुण ०६ गुन्हे** त्यापैकी **पुणे शहरातील बुलेट मोटारसायकल चोरीचे ०४** व **उल्हासनगर, जि.ठाणे येथील सुझुकी एक्सीस गाडया चोरीचे ०२ गुन्हे** उघडकीस आणून **एकुण ०६ दुचाकी गाडया किं.रु.०६,२५,०००/- चा माल** हस्तगत केला आहे.

वरील कारवाईत वाहनचोरी विरोधी पथकाकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, दिपक लगड, कर्मचारी जितेंद्र तुपे, गणेश साळुंके, सागर घोरपडे, मोहन येलपले यांनी सहभाग घेतला आहे.